# Pimpri Chinchwad Police Commissionerate

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/८८४/२०२०

प्रेसनोट

दिनांक - २८/०२/२०२०

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशनानुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन मी सुधीर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**दिघी आळंदी वाहतुक विभाग अंतर्गत**

१. मरकळ कडुन येणारी अवजड वाहने ही धानोरेफाटा/ पी.एस.पी. चौक येथुन आळंदी शहरात न येता डावीकडे वळयुन च-होली फाटा व तेथुन देहुफाटा मोशी मार्गे चाकण तसेच मोशीकडे जातील.

२. आळंदी फाटा नाशिक रोड येथुन चाकण घाटातुन चाकण चौक मार्गे मरकळ कडे जाणारी अवजड वाहने आळंदी शहरात न येता ती नाशिक पुणे महामार्गाने मोशी-देहुफाटा येथुन पुढे हवालदार वस्ती मार्गे आळंदी देहुफाटा येथुन पुढे उजवीकडे च-होली फाटा मार्गे मरकळकडे जातील.

३. पुणे शहरकडुन विश्रांतवाडी ,दिघी मार्गे आलेली व आळंदी मार्गे चाकणकडे जाणारी जड वाहने आळंदी शहरात न येता ती देहुफाटा आळंदी येथे डावीकडे हवालदार वस्तीमार्गे पुणे नाशिक रोडवरुन चाकणकडे जातील. तसेच चाकण-शिक्रापूर रस्त्यावर जाणारी (वडगाव रोडवरुन )वाहने च-होलीफाटा, धानोरेफाटा, पी.एस.सी.चौक मार्गे मरकळकडुन कोयाळीफाटा मार्गे चाकण शिक्रापुर रस्त्यावर जातील.

४. आळंदी फाटा नाशिक रोड येथुन चाकण घाटातुन चाकण चौक मार्गे दिघी/पुणे कडे जाणारी अवजड वाहने आळंदी शहरात न येता ती नाशिक पुणे महामार्गाने मोशी-देहुफाटा येथुन पुढे हवालदार वस्ती मार्गे आळंदी देहुफाटा येथुन पुढे उजवीकडे वळुन दिघी/पुणेकडे जातील.

५. आळंदी फाटा शेलपिंपळगाव येथुन चाकण-शिक्रापुर रस्त्यावरील अवजड वाहने पुणेकडे जाण्यासाठी कोयाळी फाटा येथुन आळंदी शहरात वडगाव चौकात न येता कोयाळी फाटा येथुन मरकळ मार्गे धानोरी फाटा/पी.एस.पी.चौक येथुन च-होली फाटा मार्गे पुणेकडे जातील.

६. पुणे शहर कडुन विश्रांतवाडी,दिघी मार्गे आलेली व आळंदी मार्गे चाकण-शिक्रापुर रस्त्यावर जाणारी(वडगाव रोडवरुन) वाहने च-होलीफाटा,धानोरेफाटा,पी.सी.एस.चौक मार्गे मरकळकडुन कोयाळीफाटा मार्गे चाकण शिक्रापुर रस्त्यावर जातील.

दिघी-आळंदी वाहतुक विभाग अंतर्गत आळंदी येथे अवजड वाहनांना वरील प्रमाणे सकाळी ०७.०० ते २२.०० वाजे पर्यंत प्रवेश बंदी आदेश (नोटीफिकेशन )करण्यात येत आहे.

Shiremath
(सुधीर हिरेमठ)भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
३)सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
४) प्रभारी अधिकारी दिघी -आळंदी वाहतुक विभाग
५) कार्यकारी अभियंता एम आय डी सी
२/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बंधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.